11 OCT 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तुम्ही, या विषयाच्या परीक्षेला गैरहजर राहिलात!

## परीक्षा विभागाचा विद्यार्थ्यांना मोबाईल संदेश; ऑनलाईनवर भर

**कोल्हापूर : विजय पाटील**

'तुम्ही, या विषयाच्या परीक्षेला गैरहजर राहिलात!' अशा मजकुराचा संदेश एखाद्या विद्यार्थ्याच्या मोबाईलवर आला की समजायचे त्याने आजचा पेपर दिलेला नाही. एखादा विद्यार्थी परीक्षेस गैरहजर राहिला तर आता त्याच्या



मोबाईलवर तत्काळ शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून संदेश दिला जात आहे. यातून संबंधित विद्यार्थ्याला पेपरला बसला नसल्याची जाणीव करून दिली जाते. आतापर्यंत एक हजार विद्यार्थ्यांना असे संदेश पाठविले आहेत. सत्र परीक्षा कालावधीत किमान तीस हजार विद्यार्थ्यांना असे संदेश मिळणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने ऑनलाईनवर भर दिला आहे. त्यामुळे वेळ, श्रमात बचत होऊन खर्चातही काटकसर होत आहे. तसेच तंत्रज्ञानाच्या वापराने तक्रारींचे निराकरणही जलद होत आहे. परीक्षा विभागाकडून प्रश्नपत्रिका सर्व केंद्रांवर ऑनलाईन दिल्या जातात. पेपरच्या वेळेच्या आधी दोन तास संबंधित कॉलेजकडे या प्रश्नपत्रिका पाठवल्या



जातात. यामुळे पारदर्शकता वाढली आहे.

विद्यापीठाच्या विविध परीक्षांना सुमारे तीन लाख विद्यार्थी बसतात. दरवर्षी परीक्षेस गैरहजेरीचे सरासरी प्रमाण सात टक्क्यांच्या आसपास असते. सध्याच्या परीक्षेसही हे प्रमाण त्याचपटीत गृहीत धरण्यात आले तर किमान तीस हजार विद्यार्थ्यांना असा संदेश प्राप्त होणार आहे. काही परीक्षार्थी परीक्षा अपूर्ण देतात. म्हणजे एक-दोन पेपरला संबंधित विद्यार्थी

> “ मोबाईलवरून गैरहजेरीसंदर्भात दिल्या जाणाऱ्या मेसेजचा चांगला परिणाम होईल, अशी आशा आहे. विद्यार्थ्यांनाही आपण हा पेपर दिलेला नाही हे माहीत असले तरी परीक्षा विभागाकडून रीतसर तसे कळवले जात आहे. यामुळे परीक्षेच्या हजर-गैरहजेरीच्या तक्रारींचे प्रमाण कमी होणार आहे.
>
> **- महेश काकडे,**
> परीक्षा नियंत्रक

गैरहजर राहतात. यापूर्वी गैरहजेरीचे रेकॉर्ड मॅन्युअल स्वरूपाचे होते. त्यामुळे यामध्ये क्लिष्टता होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
11 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठात १२ ऑक्टोबर रोजी राज्यस्तरीय कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र व एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने दि. १२ रोजी युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे मोड्यूल' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाचे विभागप्रमुख कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. युनिसेफच्या पुढाकारातून शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाने शाश्वत विकासाची उद्दिष्टे गाठण्यासाठी मोड्यूल तयार केले आहे. या मोड्यूलच्या स्वरूपावर राज्यातील तज्ज्ञ प्राध्यापक कार्यशाळेत चर्चा करणार आहेत. चर्चेतून आलेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा मोड्यूलमध्ये समावेश करण्यात येणार आहे. तज्ज्ञांकडून मोड्यूल निश्चित झाल्यानंतर ते अभ्यासक्रमात सामाविष्ट करण्यात येणार आहे. प्रारंभीच्या टप्प्यात पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात हे मोड्यूल समाविष्ट करण्यात येईल. यासाठी राज्यातील पत्रकारिता विभागाचे प्रमुख पुढाकार घेतील, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी पत्रकाद्वारे दिली.

जनसंपर्क कक्ष
11 OCT 2017 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागप्रमुखपदी डॉ. लंगरे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागप्रमुखपदी डॉ. चंद्रकांत लंगरे यांची निवड झाली आहे. यापुर्वी डॉ. ए. ए. अतार अधिविभागप्रमुख होते, त्यांच्या रिक्त जागेवर डॉ. लंगरे यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ.लंगरे मुळचे कोल्हापूर जिल्हयातील धरणगुत्ती येथील रहिवासी आहेत. त्यांनी अमेरिका, इंग्लंड आणि इटली येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चा सत्रात सहभाग नोंदवला आहे. अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज आसोसिएशनतर्फे आयोजित सिएटल, वॉशिंगटन (२०१२) आणि जॉन्स हॉफकिन्स युनिव्हर्सिटी, बाल्टीमोर मेरीलँड (२०१७) येथे सबालटर्न लिटरेचर आणि शाम बेनेगल यांच्या चित्रपटांचा राष्ट्रीयत्व बांधणीमधील सहभाग या विषयावर त्यांनी शोधनिबंध सादर केला आहे. जोसेफ कॉनरॅड सोसायटी इंग्लंड यांनी रोम येथील रोमा त्रे युनिव्हर्सिटी (२०१३) आणि इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ केंट, कॅंटरबरी (२०१४) येथील चर्चासत्रात जोसेफ कॉनरॅड यांच्या कादंबरीवरही त्यांनी शोधनिबंध सादर केला आहे. तसेच युनिव्हर्सिटी ऑफ रिडींग, इंग्लंड येथे अर्ली मॉडर्न स्टडीज असोसिएशनतर्फे आयोजित आंतराष्ट्रीय परिषदेत इंडियन भक्ती मुव्हमेंट या सत्रात शोधनिबंध सादर केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सात विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी संपादन केली आहे. या निवडीसाठी त्यांना कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे, प्र–कुलगुरु डॉ.डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि सहकारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठ मतदारांची उद्या पक्की यादी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा व विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीची पक्की मतदार यादी गुरुवारी (दि.१२ ऑक्टोबर) विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून प्रसिद्ध केली जाणार आहे. मतदार यादी दुरुस्तीसंदर्भात विविध मतदारवर्गांसाठी दीडशे हरकती प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत. दरम्यान, निवडणुकीसंदर्भात सूचना २२ ऑक्टोबरला जाहीर केली जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठात कौशल्यावर आधारित निरंतर शिक्षण अभ्यासांना प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी** शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागात स्वयं आधारित निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांचे उद्‌घाटन विभागाच्या प्र.संचालक व विभागप्रमुख डॉ.सुमन बुवा यांच्या हस्ते झाले. इव्हेंट मॅनेजमेंट, बालवाडी शिक्षक शिक्षण, मानवी हक्क, संवाद कौशल्य, रेडिओ जॉकी, रोपवाटिका उद्यान कौशल्य, सूत्रसंचालन, योग शिक्षक, प्राथमिक योग, समाजकार्य शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास अशा सामाजिक, शैक्षणिक गरजेवर आधारित रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2017
सकाळ

# 'कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम उपयुक्त'

कोल्हापूर, ता. १० : कौशल्यावर आधारित व्यावसायिक दृष्टिकोनातून निर्मिती केलेल्या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरचा मार्ग सोपा झाला आहे, असे प्रतिपादन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागात आयोजित स्वयंआधारित निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. इव्हेंट मॅनेजमेंट, बालवाडी शिक्षक शिक्षण, मानवी हक्क, संवाद कौशल्य, रेडिओ जॉकी, रोपवाटिका उद्यान कौशल्य, सूत्रसंचालन व निवेदन, योग शिक्षक, प्राथमिक योग, समाजकार्य शिक्षण, शैक्षणिक गरजेवर आधारित रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विभागात प्रारंभ झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2017
लोकमत

# निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांचा प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये स्वयंआधारित निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांचा प्रारंभ करण्यात आला. या अभ्यासक्रमांचे उद्घाटन विस्तार विभागाच्या प्रमुख डॉ. सुमन बुवा यांच्या हस्ते झाले.समाजकार्य शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास अशा सामाजिक, शैक्षणिक गरजांवर आधारित रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा प्रारंभ झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2017
लोकसत्ता

## डॉ. चंद्रकांत लंगरे यांची निवड

**प्रतिनिधी, कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील डॉ. चंद्रकांत लंगरे यांची इंग्रजी अधिविभागप्रमुखपदी निवड झाली आहे. डॉ. लंगरे यांनी अमेरिका, इंग्लंड आणि इटली येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात आपले शोधनिबंध सादर केले आहेत.